MHRT080000832021

<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १३/२०२१</u>

<u>मधील निशाणी ७६ खालील आदेश</u>

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १५ विरुध्द मुदतीत वारस रेकॉर्डवर न आणलेणे त्यांचे विरुध्द दावा तांत्रिकदृष्टया अबेट झालेला आहे. सदरचा आदेश सेट—असाईड होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे.

२. वादी प्रस्तुत अर्जात असे नमुद करतात की, प्रतिवादी क्र. १५ झिलु दाजी गुरव हे दिनांक २९/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी मयत झाल्यानंतर वादींना कळले आहे. प्रतिवादी क्र.१५ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी वादी हे आजारी असल्यामुळे व त्यांना हिंडणे फिरणे शक्य नसल्यामुळे ४१२ दिवसांचा विलंब झाला आहे. सबब न्यायाचे दृष्टीने वारस रेकॉर्डवर घेण्यात यावेत अशी विनंती वादीनी केलेली आहे. तरी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी नं. १५ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळावा व प्रतिवादी नं. १५ चे वारस रेकॉर्डवर न आणल्याने त्यांचे विरुध्द तांत्रिकदृष्टया झालेला अबेटमेंटचा आदेश सेट—असाईट होवून मिळावा.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर आपले लेखी म्हणणे देवून या अर्जास हरकत घेतलेली आहे. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, वारस मुदतीत न आणण्याचे कारण खोटे आहे. अबेटमेंट सेट असाईड करण्यासाठी उशिर झाला आहे. तरी वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. प्रस्तुत दाव्यातील संपूर्ण अभिलेख, प्रस्तुतचा अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे याचे

अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा अर्ज सरस—निरस—तुटक वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. एकंदरीत दाव्याचे व वादीने सदर अर्जात केलेल्या मागणीचे स्वरूप बघता, दाव्यामध्ये प्रतिवादी नं. १५ चे वारसांना पटलावर घेणे गरजेचे आहे. तसेच दाव्याच्या प्रामाणिक व अंतिम न्यायनिवाडयाकरीता सदरचा अर्ज मंजूर करणे उचित ठरले असे मला वाटते. नि. ७४ खाली पारीत झालेल्या आदेशानुसार विलंब माफ करण्यात आल्यावर प्रतिवादी क्र. १५ च्या विराधात झालेल्या अबेटमेंटचा आदेश सेट असाईड करण्यात येतो. सबब, मी खालील आदेश पारीत करते.

—: **आदेश** :—

१. अर्ज निशाणी ७६ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं. १५ चे वारसा विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करणेत येतो.

३. नि. ७४ खाली पारीत आदेशानुसार खर्चाची रक्कम भरल्यानंतर सदरच्या अर्जाची अंमलबजावणी होईल.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2022.11.15 14:23:42 +0530

**दिनांक : ११/११/२०२२**

**सह दिवाणी न्यायाधीश क—स्तर,**
**देवरुख.**

-: **C E R T I F I C A T E** :-

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 13/2021 |
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Jr. Clerk | : | T.N.Khade |
| Court Name | : | Jt. Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 11/11/2022 |
| Order signed by Presiding Officer on | : | 11/11/2022 |
| Order uploaded on | : | 12/11/2022 |